सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : २७ | सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२० ऑक्टोबर

- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची (PDKV) अकोला येथे स्थापना.
- हरित क्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोरलॉग यांना नोबेल पारितोषिक जाहीर.
- तब्बल 40 वर्षे रंगभूमीवर प्रयोग करणारे पंडित सत्यदेव दुबे यांना विष्णुदास भावे गौरव पदक जाहीर झाले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# पांझरा नदीपात्रातील वाळू उपशाला कोणाचे अभय?

## वाळू माफियांच्या नोटांचा ‘ भर वर भर ’ आणि ‘ चर वर चर ’चा दुष्परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील पांझरा नदीच्या पात्रातून बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. महसूल प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाया ‘सोयीस्कर’ व दुटप्पी धोरणाच्या दिसत आहेत. प्रशासनाची ही भुमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे. वाळू माफियांच्या नोटांचा भर वर भर आणि चर वर चरचाच हा दुष्परिणाम असल्याचा पर्यावरण प्रेमींचा आरोप आहे.

निवडक आणि लहान वाहतूकदारांविरुद्धच कारवाईचा बडगा उगारला जात आहे. प्रशासनाचे ‘अर्थपूर्ण’ दुर्लक्ष आहे. या वाळू उपशाला कोणाचे अभय तर नाही ना? असा प्रश्न निर्माण होतो. समुद्रातले मासे सोडून डबक्यातले मासे पकडले जात आहे. सर्वच स्तरावर ‘ तेरी भी दिवाली, मेरी भी दिवाली, नदी कि बन जाये होली ’ असे चित्र आहे.

**वाळू माफियांचा धुमाकूळ**

सध्या दिवाळीच्या सलग सुट्ट्यांमुळे प्रशासन खऱ्या अर्थाने सुट्टीवर आहे. याचा गैरफायदा घेत वाळू माफियांची ‘चांगलीच दिवाळी’ सुरू आहे. अर्थात वाळू माफियांच्या डोक्यावर मोठा हात असल्यानेच त्यांनी नेहमीप्रमाणे बिनधास्तपणे वाळू उपसा सुरूच ठेवला आहे. वृत्तपत्रे, सोशलमीडिया याद्वारे लोकप्रतिनिधी व प्रशासनाला कितीही जागे करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांनी झोपेचे सोंग घेतल्याने ते जागेच होत नाही. त्यांच्या उशी व गादीच्याखाली नेमक्या कसल्या गड्डया आहेत की ज्यामुळे त्यांना कुंभकर्णी झोप लागली आहे हे सर्वांनाच कळते आहे. वाळू उपश्याचा फटका सहन करणारे हजारोंच्या संख्येने असलेले ग्रामस्थ, नागरिक, पर्यावरणप्रेमी रस्त्यावर उतरण्याऐवजी फक्त बोटे मोडीत आहेत. त्यामुळे सारे काही अलबेल चालू आहे.

महसूल प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन वाळूची अवैध लूट थांबविणे गरजेचे आहे.

**प्रामाणिक पथके तैनात व्हावी**

गेल्या काही दिवसातील महसूल प्रशासनाची कारवाई आहे. एका घटनेत, मांडळ गावातून वाळू घेऊन जाणारे एक लहान ट्रॅक्टर जप्त करून तहसील कार्यालयात जमा केले जाते. मात्र, याच वेळी अमळनेर शहराच्या ‘उतरण’ भागातून डंपरने मोठ्या क्षमतेचे वाहतूक सुरू आहे. या वाहतुकीला लगाम लावणे अत्यावश्यक बनले आहे. तालुक्यातील पांझरा नदीकाठावर प्रामाणिक व धाडसी पथके तैनात करण्याची गरज आहे. अन्यथा गौण खनिजाची लूटमार होतच राहील. आज पासून ३० ते ४० वर्षांपूर्वी फरशीपुलावरून दिसणारे बोरी पात्र रेतीने समृद्ध होते आज संपूर्ण पात्र रेतीविना बोडके व विद्रुप दिसते आहे. त्वरीत योग्य उपाययोजन न झाल्यास तालुक्यातील सर्वच नदीपात्रांची अवहेलना होण्यास वेळ लागणार नाही. आज फरशीपुलाच्या दोन्ही बाजूला मुलांना खेळण्यासाठी रेती नाही ज्यापिढीने या रेतीत मनसोक्त मस्ती केली ते त्यांच्या पिढीला तो आनंद देऊ शकत नसल्याचे त्यांना निश्चित दुःख आहे. तालुक्यात सर्वत्र असे झाल्यास येणाऱ्या पिढ्या आपणास माफ करणार नाहीत.

### तलाठ्यांवर हल्ला होऊनही लूट

काही दिवसांपूर्वी मांडळ परिसरात वाळू माफियांनी थेट शासकीय कर्मचाऱ्यांशी (तलाठ्यांशी) धक्काबुक्की करून शिवीगाळ केल्याची गंभीर घटना घडली होती. याप्रकरणी गुन्हे दाखल होऊनही या प्रबळ माफियांवर कोणतीही प्रभावी आणि दीर्घकाळ टिकणारी धाकदपटशाची कारवाई झालेली नाही. याचा परिणाम म्हणजे, वाळू उपसा पूर्वीपेक्षा अधिक निर्धास्तपणे आणि आक्रमकपणे सुरू असल्याचे धक्कादायक चित्र आहे.



# ई- केवायसीचा बोजवारा

## संकेतस्थळ ठप्प; लाडकी बहीण योजनेत अडथळे वाढले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ मिळवण्यासाठी शासनाने ई-केवायसी अनिवार्य केली आहे. त्यामुळे महिलांची ऐन दिवाळीत धावपळ होतआहे. शहरातील सेतू केंद्रांवर महिलांची प्रचंड गर्दी दिसून येत आहे. मात्र, संकेतस्थळ ठप्प पडल्याने महिलांना हेलपाटे मारावे लागत आहेत.

शासनाने पुढील महिन्यांत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे बंधन घातले आहे. वेळेत प्रक्रिया पूर्ण न झाल्यास योजनेचा लाभ बंद होणार आहे. महिला चिंतातूर झाल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीकडे लक्ष देत तत्कालीन महायुती सरकारकडून ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजना जाहीर करण्यात आली होती. मात्र, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा ताण आला आहे. लाभ फक्त पात्र लाभार्थींनाच मिळावा, यासाठी आता शासनाने ई-केवायसी बंधनकारक केली आहे. दरम्यान, अमळनेर व परिसरातील अनेक सेतू केंद्रांवर महिलांची मोठी गर्दी आहे. संकेतस्थळ कामच करत नसल्याने अनेकांना परत जावे लागत आहे. योजनेचा लाभ मिळेल की नाही ? या अनिश्चिततेत ‘लाडक्या’ बहिणी सापडल्या आहेत. वेबसाइट सुरू न होत असल्याने अनेक बहिणींच्या ई-केवायसी प्रक्रिया अडकल्या असून, शासनाने तातडीने तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, असा मागणी व्यक्त होत आहे

### केवायसी कशी कराल?

लाडकी बहीण योजनेसाठी लाभार्थींनी https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी.

कृती: ■आधार प्रमाणीकरण फॉर्म भरा.

■ओटीपीच्या लिंकवर क्लिक केल्यानंतर ई-केवायसी आधी झालीआहे की नाही, हे तपासा.

■पात्र लाभार्थींच्या यादीत नाव असल्यास ओटीपी टाकून पुढील प्रक्रिया पूर्ण करा.त्यानंतर पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक भरावा लागेल.

## तलाठी भरती संदर्भात मोठी घोषणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेली तलाठी भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागली आहे. राज्यात १७०० पेक्षा अधिक तलाठी पदे लवकरच भरण्यात येणार आहे. या भरतीसाठी शासन स्तरावर हालचाली सुरु झाल्या आहेत. जिल्हानिहाय रिक्त जागांचा अहवाल तयार करणे सुरू आहेत.

तलाठी भरती प्रक्रिया पारदर्शक व जलदगतीने राबविण्यात येईल. जिल्हाधिकारी व विभागी अधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

# शिवशक्ती चौकातील उघड्यावरील ट्रान्सफार्मर देताहेत अपघाताला आमंत्रण!

## वीज वितरण कंपनी, पालिका प्रशासनाचे दूर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवशक्ती चौकात वीज कंपनीचे ट्रान्सफॉर्मर व विद्युत पॅनल उघड्यावर आहेत. या ठिकाणाहून रोज शेकडो नागरिक, शालेय विद्यार्थी, महिला व लहान मुले जातात. मात्र, वीज वितरण कंपनी आणि पालिका प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

पॅनल बॉक्समध्ये कोणतेही कुलुपबंद दरवाजे नाहीत. वायर तुटून लोंबकळलेल्या अवस्थेत आहेत. तेथे पाणी साचल्यास शॉर्टसर्किट होऊन मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या उघड्यावरील ट्रान्सफार्मरीची पाहणी करायलाही कोणी येत नाही. संबंधित विभाग एखाद्याचा बळी गेल्यावरच जागा होईल का? असा संताप परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे. कचऱ्याचे ढिग मोठ्या प्रमाणात साचले आहेत. या ढिगांमुळे परिसर अत्यंत घाणेरडा दिसतो. त्याची खूप दुर्गंधी येते. त्यामुळे विविध आजारांना आपसुकच आमंत्रण मिळते. परिसरातील लहान मुलांना नेहमीच साथीचे आजार होतात. याकडेही प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### नागरिकांच्या मागण्या.......

उघडा असलेला पॅनल तातडीने बंद करावा. त्यावर सुरक्षित कव्हर बसवावे. तेथे सूचना फलक आणि बॅरिकेट्स लावावेत.शहरात नियमित तपासणी मोहीम राबवावी. शिवशक्ती चौक परिसरात स्वच्छता करावी.



(छायाचित्र : शरद कुलकर्णी)



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# दगडी दरवाजाजवळील वाहतुकीच्या कोंडीने नागरिक हैराण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य मार्गांवर वाहनांची प्रचंड वर्दळ वाढली आहे. दगडी दरवाजा ते तिरंगा चौक या दरम्यान रोजच वाहनांची कोंडी होत आहे. प्रवासी व नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. अरुंद रस्ता, बेशिस्त पार्किंग आणि अतिक्रमणामुळे वाहतुकीचा ताण वाढला आहे. या गंभीर स्थितीकडे वाहतूक शाखेने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

काही वर्षांपूर्वी दगडी दरवाजाजवळील अतिक्रमण काढण्यात आले होते. तसेच दगडी दरवाजा हा रस्त्यावर येत असल्याने. पुरातत्व विभागाची परवानगी घेऊन दगडी दरवाजाच्या रचनेत काहीसा बदल करून रस्ता काही अंशी मोकळा करण्यात आला होता. मात्र, तरीही एकाच वेळी दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास तेथे वाहतुकीची नेहमीच कोंडी होत असते. परिणामी प्रवाशांना याचा त्रास होत असतो. दिवाळीनिमित्त ये- जा करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे या परिसरात रस्ता अरुंद असल्याने वाहनांच्या रांगा लागतात. वाहतुकीची कोंडी झाल्यास थेट पाचपावली देवी मंदिर परिसरातपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. यासाठी पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. वाहतूक शाखेच्या पोलिसांची कायमस्वरुपी तेथे नेमणूक आवश्यक आहे. त्यातच सणाचा काळ असल्याने वाहतुक सुरळीत ठेवण्याची गरज आहे. सराफ बाजारात जाण्याचा मार्ग हा दगडी दरवाजातूनही जातो. परिणामी दुचाकीस्वार, पादचारीही दगडी दरवाजातून बाजारात जात असतात. प्रवेशद्वारसमोरच अमळनेर- चोपडा मुख्य रस्ता येत असल्याने रोज शेकडो वाहने ये- जा करीत असतात. परिणामी वाहतुकीचा खोळंबा होतो.

तिरंगा चौकाजवळील चौफुलीचा मार्ग परिसरातील विविध गल्लीतून थेट बाजारपेठेशी जोडला जातो. या मार्गावर अवजड ट्रक, डंपर आणि दुचाकींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने प्रवाशांना तसेच पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

### बेशिस्त पार्किंगमुळे अडथळा

बाजारात येणारे नागरिक आपली वाहने रस्त्याच्या कडेला जिथे जागा मिळेल तिथेच पार्क करून निघून जातात. त्यामुळे आधीच अरुंद असलेले रस्ते अधिकच कोंडीत सापडतात. बाजारातील हातगाड्या, फेरीवाले आणि पसरलेली दुकाने यामुळे रस्त्यांची रुंदी अर्ध्यावर आली आहे.

### हॉर्नचा कर्कश आवाज

वाहनांची रेलचेल, कर्णकर्कश आवाजामुळे प्रदूषण, ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. वाहतूक नियंत्रणासाठी कोणत्याही उपाययोजना होताना दिसून येत नाही. परिणामी नागरिक त्रस्त झालेले आहेत.

## आपली दिवाळी, स्वदेशी दिवाळी

दिवाळी आपल्यासाठीही अन्

## गरिबांसाठीही





स्वदेशीचा अंगीकार करीत
स्थानिक खरेदीला महत्त्व देऊया..
गरीब, कष्टकरी, मध्यमवर्गीय, छोटे उद्योजक,
छोटे व्यावसायिक, स्थानिक कारागीर,
महिला बचत गट यांच्या उत्पादनांना खरेदी
करूया.. त्यांच्या घरातही प्रकाशपर्व साजरे
करण्यासाठी आपण हातभार लावूया..
प्रकाशपर्व, आनंदपर्व आणि समृध्दीपर्व
म्हणजेच दिवाळी.. चला, जागे व्हा..!
परदेशी वस्तूंना झुगारूया.. ऑनलाईन
तथा विदेशी उत्पादनांच्या खरेदीऐवजी
स्वदेशीच उत्पादने खरेदी करूया..!

**स्वदेशी उत्पादने खरेदी करून देशाला आणि गरजूंना बळ देऊया...!**
**हीच खरी तुमची, आमची, आपल्या सर्वांचीच दिवाळी...!!**




# सांगलीच्या शेतकऱ्याचा स्वदेशी फॉर्म्युला; हळदीचे उत्पादन दुप्पट, वर्षाला २१ लाखांची उलाढाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील सांगली येथील शेतकरी विनोद तोडकर यांनी रासायनिक शेतीतील घटते उत्पादन आणि वाढता खर्च यांना कंटाळून जैविक शेतीकडे वळण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्वतःचा खास फॉर्म्युला विकसित करून हळदीचे प्रति एकर उत्पादन २०-२५ क्विंटलवरून ४०-५२ क्विंटलपर्यंत वाढविले. यामुळे त्यांची वार्षिक उलाढाल २१ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. ते आपले यशस्वी तंत्रज्ञान इतर शेतकऱ्यांसोबत शेअर करीत आहेत.

**पारंपरिक शेतीतील आव्हाने**

विनोद तोडकर यांनी दोन दशके हळदीची पारंपरिक शेती केली, पण हवामान बदल, बुरशीजन्य रोग आणि रासायनिक खतांच्या (NPK) वाढत्या किमतींमुळे शेती तोट्यात जाऊ लागली. मुळांमध्ये बुरशी आणि जमिनीच्या सुपीकतेची हानी यामुळे उत्पादन घटत होते, तर खर्च वाढत होता. या संकटावर मात करण्यासाठी त्यांनी जैविक शेतीचा पर्याय निवडला. ज्याने त्यांच्या शेतीचे चित्र पूर्णपणे बदलले.

**जैविक शेतीचा चमत्कार**

विनोद यांनी पशुखत, गांडुळ खत, कंपोस्ट आणि नैसर्गिक कीटकनाशकांवर आधारित जैविक शेती स्वीकारली. यामुळे जमिनीची सुपीकता वाढली. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी झाले. परिणामी त्यांचे हळदीचे उत्पादन प्रति एकर २०-२५ क्विंटलवरून ४०-४५ क्विंटलवर पोहोचले, तर एका हंगामात ५२ क्विंटलचा विक्रमही झाला. मागील हंगामात त्यांनी १.५ एकरमधून ३ टन (३००० किलो) सेंद्रिय हळद पावडर ७५० रुपये प्रति किलो दराने विकली. ज्यामुळे २१ लाखांची उलाढाल झाली. खर्च वजा केल्यानंतर १० लाख रुपये निव्वळ नफा मिळाला. म्हणजेच प्रति एकर सुमारे ६.५ लाख रुपये.

**हळदीसोबत धण्याची लागवड**

विनोद तोडकर जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी जीवामृत आणि गांडुळ खत वापरतात. हळदीचे कंद मेढ-नाली पद्धतीने लावतात. ज्यामुळे अतिरिक्त पाणी वाहून जाते आणि कंद कुजण्यापासून वाचतात. ठिबक सिंचनाद्वारे पाणी आणि खत थेट मुळांपर्यंत पोहोचवले जाते. ज्यामुळे पाण्याची बचत होते. हळद हे दीर्घकालीन पीक असल्याने त्यांनी धण्याची आंतरपीक लागवड सुरू केली. हळद तयार होण्यापूर्वीच अतिरिक्त उत्पन्न मिळते. त्यांचे हळद आणि धणे 'तोडकर ॲग्रो फार्म्स' या स्वतःच्या ब्रँडअंतर्गत विकले जाते.

**इतरांना प्रेरणा**

विनोद तोडकर आपले यशाचे सूत्र आणि अनुभव इतर शेतकऱ्यांसमवेत उत्साहाने शेअर करतात. त्यांच्या या जैविक शेतीच्या तंत्राने अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली आहे. ज्यामुळे शाश्वत आणि फायदेशीर शेतीचा मार्ग खुला झाला आहे.

### विनोद यांचा खास फॉर्म्युला

विनोद तोडकर यांच्या यशामागे त्यांचा स्वदेशी फॉर्म्युला आहे. त्यांनी NPK एजोटोबॅक्टर नावाचे जैविक बायोफर्टिलायझर वापरण्याचा सल्ला शेतकऱ्यांना दिला. हे बायोफर्टिलायझर एकदाच खरेदी करून दही जमवल्याप्रमाणे शेतात वाढविता येते. यासाठी १ लिटर NPK एजोटोबॅक्टरमध्ये २०० लिटर पाणी, गूळ, साखर, उडीद डाळ, अंकुरित धान्य आणि अंड्याची पावडर मिसळून ४-५ दिवस ठेवले जाते. हळदीच्या ९ महिन्यांच्या पीक कालावधीत हे मिश्रण १०-१२ वेळा वापरले जाते. ज्यामुळे पिकाला आवश्यक पोषक तत्त्वे मिळतात आणि खर्च कमी होतो.

**सक्सेस स्टोरी**



## सलमान खान : बाप तो बाप होता है!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


*बॉलीवुड का 'दबंग' सलमान खान आपल्या मनमौजी स्वभावासाठी ओळखला जातो. तो जे ठरवतो, ते करतो आणि त्याच्या मनात कोणी डोकावू शकत नाही. असाच त्याचा आपल्या भावांबाबतचा दृष्टिकोन आहे. पण तरीही त्याला 'मेंटल' म्हणणं त्याला आवडत नाही! याचं एक मजेदार उदाहरण म्हणजे सलमानचा मोठा भाऊ, सोहेल खान. खान बंधूंमधील एक, सोहेलने सलमानच्या बंधुभावाला 'मेंटल' नावाच्या चित्रपटातून सादर केलं. हा चित्रपट २४ जानेवारी २०१४ रोजी प्रदर्शित होणार होता. चित्रपटाच्या प्रोमोचं काम सुरू झालं, पण गंमत अशी की सलमानला 'मेंटल' हे नाव अजिबात आवडलं नाही! सोहेलने स्पष्ट केलं की 'मेंटल' हे नाव चुकून ठेवलं गेलं होतं, आणि सलमानच्या दिग्दर्शनात हा चित्रपट त्या नावाने प्रदर्शित होणार नाही. सलमानने ते नाव बदललं आणि चित्रपटाचं नाव ठेवलं 'जय हो'. का? कारण हा चित्रपट प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर रिलीज होत होता, आणि यात सलमानची भूमिका होती भ्रष्टाचाराविरुद्ध लढणाऱ्या नायकाची. आता अशा कथेला 'मेंटल' नाव कसं शोभेल? सलमानने यावर मिश्किलपणे टिप्पणी करत नाव बदललं!सलमानचा हा दबंग अंदाज पुन्हा एकदा दिसला. खरंच, बाप तो बाप होता है!*



## व्हायरल व्हिडिओ : ३६ लेन असूनही २४ तास गाड्या स्थिर
# चीनमधील 'गोल्डन वीक'मुळे भयंकर ट्रॅफिक जॅम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबई, बेंगळुरू किंवा दिल्लीसारख्या शहरांसाठी ट्रॅफिक जॅम ही नेहमीची गोष्ट आहे. मात्र, चीनमधील 'गोल्डन वीक' सुटीमुळे झालेल्या भयंकर वाहतूक कोंडीचा व्हायरल व्हिडिओ जगभरातील नेटकऱ्यांना थक्क करत आहे. ३६ लेन असलेल्या टोल प्लाझावर हजारो गाड्या २४ तास एकाच जागी अडकल्या होत्या. हा व्हिडिओ डेली मेलच्या इन्स्टाग्रामवर शेअर झाल्यानंतर तुफान व्हायरल झाला आहे.



**व्हिडिओमधील दृश्य**

ड्रोन फुटेजमध्ये दिसते, की अन्हुई प्रांतातील वुझुआंग टोल स्टेशनवर (Wuzhuang Toll Station) ३६ लेन असूनही गाड्या एक इंचही सरकल्या नाहीत. हजारो गाड्यांच्या लाल ब्रेक लाईट्सची लांबच लांब पट्टी रात्रीच्या अंधारात चमकताना दिसते. ही कोंडी २४ तास कायम राहिली. केवळ या स्टेशनवर १.२ लाखाहून अधिक गाड्या अडकल्या. संपूर्ण चीनमध्ये 'गोल्डन वीक' दरम्यान ८८८ दशलक्ष प्रवास झाले. ज्यामुळे अशा कोंडीचे प्रमाण वाढले.

**कोंडी कुठे आणि का झाली?**

ठिकाण : चीनमधील अन्हुई प्रांतातील वुझुआंग टोल स्टेशन, जे आशियातील सर्वांत मोठे टोल प्लाझा आहे. हे हेफ़ेई-नानजिंग एक्सप्रेसवेवर आहे. जेथे अनेक महामार्ग एकत्र येतात.

**वेळ :** ६ ऑक्टोबर २०२५ रोजी 'गोल्डन वीक' सुटी संपल्यानंतर. ही सुटी १ ऑक्टोबरपासून सुरू होते आणि नॅशनल डे व मिड-ऑटम फेस्टिव्हल एकत्र साजरा केला जातो. यात ८ दिवसांची सुटी असते.

**कारण :** सुटीत लाखो लोक घराबाहेर पडतात आणि परततात. टोल प्लाझावर ३६ लेन असूनही ते फक्त ४ लेनमध्ये मर्ज होतात. ज्यामुळे गर्दी वाढते. यंदा टायफून 'मायडेम'मुळे पावसाळ्यातही अडथळे आले. चीनमध्ये दरवर्षी अशी कोंडी अपेक्षित असते. कारण लोक या सुटीची आतुरतेने वाट पाहतात.

**इतिहासातील मोठा ट्रॅफिक जॅम**

हा जॅम भयंकर असला तरी इतिहासातील सर्वांत मोठा जॅम २०१० मधील बीजिंग-टिबेट एक्सप्रेसवेवर झाला होता. जो १२ दिवस कायम राहिला आणि १०० किलोमीटर लांबीचा होता.

**कारणे :** रस्ते बांधकाम, ट्रक ब्रेकडाउन आणि वाढती वाहतूक. वुझुआंग जॅम मात्र रुंदीमुळे (३६ लेन) आणि सुटीच्या गर्दीमुळे खास आहे.

### गोल्डन वीक म्हणजे काय?

१ ऑक्टोबर १९४९ रोजी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना स्थापन झाल्याच्या स्मरणार्थ साजरा होणारा हा राष्ट्रीय सण आहे. सरकारी आणि खासगी कार्यालये बंद असतात. लोक प्रवास करून सुटीचा आनंद घेतात. यंदा ८८८ दशलक्ष प्रवास आणि ८०९ अब्ज युआन (सुमारे ११४ अब्ज डॉलर) खर्च झाला. ज्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. मात्र वाहतूक व्यवस्था ताणली गेली.

**प्रश्न 1 : हा व्हायरल व्हिडिओ कशाबाबत आहे?**
उत्तर : हा व्हिडिओ चीनमधील वुझुआंग टोल स्टेशनवरील भयंकर ट्रॅफिक जॅमचा आहे. ३६ लेन असूनही गाड्या २४ तास स्थिर राहिल्या. १.०२ लाखाहून अधिक वाहने अडकली. डेली मेलच्या इन्स्टाग्रामवर शेअर झालेला हा व्हिडिओ जगभर व्हायरल झाला.

**प्रश्न २ : ही कोंडी कुठे आणि कधी झाली ?**
उत्तर : अन्हुई प्रांतातील वुझुआंग टोल स्टेशनवर, ६ ऑक्टोबर २०२५ रोजी, 'गोल्डन वीक' सुटी संपल्यानंतर.

प्रश्न 3 : कोंडीचे मुख्य कारण काय?
*उत्तर:* 'गोल्डन वीक' ही ८ दिवसांची सुटी असते. ज्यात लाखो लोक प्रवास करतात. टोल प्लाझाची रचना (३६ लेन ४ मध्ये मर्ज) आणि हवामान अडथळ्यांमुळे कोंडी वाढली. चीनमध्ये अशी कोंडी अपेक्षित असते.

**शिकवण :** हा जॅम वाहतूक नियोजनाचे महत्त्व दाखवितो. भारतासारख्या देशांसाठीही सुटी आणि सणांदरम्यान ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी धडा आहे. व्हिडिओ पाहून नेटकरी म्हणतात, की गुरगावची नेहमीची कोंडी वाटते!

### हिंदू विवाह कायदा : घटस्फोटाच्या तरतुदींचा उदार अर्थ लावल्यास
# विवाहाचे पावित्र्य कमी होईल; दिल्ली उच्च न्यायालय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू विवाह कायदा १९५५ मधील विवाह रद्द करणे किंवा घटस्फोटास परवानगी देणाऱ्या तरतुदींचा अर्थ कठोर आणि मर्यादित स्वरूपात लावला पाहिजे. या तरतुदींचा व्यापक किंवा उदार अर्थ लावल्यास विवाहाचे पावित्र्य आणि स्थिरता धोक्यात येईल, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदविले. तसेच सप्तपदीसह आवश्यक धार्मिक विधी न झाल्याच्या कारणास्तव विवाह रद्द होत नाही, असेही न्यायमूर्ती अनिल क्षत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

'बार ॲण्ड बेंच'च्या वृत्तानुसार एका जोडप्याने ब्रिटनचा व्हिसा मिळविण्यासाठी आर्य समाज मंदिरात घाईघाईत विवाह केला आणि त्याची नोंदणी केली. मोठ्या समारंभाची योजना असताना वाद निर्माण झाले आणि आवश्यक विधी न झाल्याच्या कारणास्तव त्यांनी विवाह सुरूवातीपासूनच अवैध घोषित करण्याची मागणी कौटुंबिक न्यायालयात केली. कौटुंबिक न्यायालयाने ही मागणी फेटाळल्यानंतर जोडप्याने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

**न्यायालयाचे निरीक्षण**

याचिकेवर सुनावणीवेळी खंडपीठाने स्पष्ट केले, की अशा मागण्यांमुळे विवाहाची स्थिरता, प्रतिष्ठा आणि टिकाऊपणा जपण्याचा कायदेशीर उद्देश दुर्लक्षित होईल. हिंदू विवाह कायदा १९५५ मधील तरतुदी, विशेषतः शून्य घोषित करणारे विवाह, रद्द करण्यायोग्य विवाह, घटस्फोट आणि न्यायिक वेगळेपणा यासंबंधीच्या तरतुदींचा अर्थ आणि वापर कठोरपणे केला पाहिजे. केवळ स्पष्टपणे परिभाषित परिस्थितीतच घटस्फोटाला परवानगी द्यावी.

**विवाह रद्द करण्याची मागणी अयोग्य**

न्यायालयाने असेही नमूद केले, की आवश्यक विधी न झाल्याच्या कारणास्तव विवाह रद्द करण्याची मागणी हिंदू विवाह कायद्याअंतर्गत टिकणारी नाही. कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही जी कलम ७ नुसार विवाह कधीही संपन्न झाला नाही. या कारणास्तव तो सुरूवातीपासूनच अवैध घोषित करण्यास सक्षम करते. घटस्फोटासाठीची कारणे निश्चित करणाऱ्या सर्व तरतुदी केवळ विधिवत संपन्न झालेल्या विवाहांनाच लागू होतात. त्यामुळे खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवला.

विवाह नोंदणी प्रणालीवर परिणाम खंडपीठाने याचिकेला कायद्याचा गैरवापर करण्याचा प्रयत्न मानले. अशी मागणी मान्य केल्यास विवाह नोंदणी प्रणालीची बदनामी होऊ शकते. याचे आंतरराष्ट्रीय परिणाम होऊ शकतात. काही धूर्त व्यक्ती कागदपत्रे मिळवण्यासाठी किंवा गैरकृत्याला वैधता देण्यासाठी याचा गैरवापर करू शकतात, असेही न्यायालयाने नमूद केले.

# दुनिया के ये देश जहाँ आज भी राजाओं का राज, भव्य महल से गोल्डन कार तक...!

हमनें बचपन में सुनी हुई राजा-रानी की कहानियां आज भी याद हैं। भारत अब लोकतंत्र है, लेकिन कभी यहाँ राजशाही थी। कुछ रॉयल परिवार अब भी हैं, मगर उनकी शक्ति सीमित है। फिर भी, दुनिया में कई देश ऐसे हैं जहां राजा ही शासक हैं, न कि राष्ट्रपति या प्रधानमंत्री। आइए जानें इन देशों के बारे में :

**ब्रुनेई : सोने का महल**

ब्रुनेई में सुल्तान हसन अल बोल्कियाह का शासन है। वे दुनिया के सबसे अमीर शासकों में से एक हैं, जिनकी संपत्ति एक हजार तीनसो ६३ अरब रुपये है। उनका दोन हजार तीनसो ८७ करोड़ का महल बीस लाख वर्ग फीट में फैला है, जिसमें पंधरासों से अधिक कमरे हैं। रमजान में यह महल तीन दिन के लिए जनता के लिए खुलता है।

**भूटान : खुशहाली का देश**

भूटान के राजा जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक हैं। यहाँ राजा का दर्जा सर्वोच्च है, हालांकि प्रधानमंत्री भी है। भूटान विकास को "ग्रॉस नेशनल हैप्पीनेस" से मापता है। यह खूबसूरत और सस्ता पर्यटन स्थल है, जहां भारतीयों को वीजा की जरूरत नहीं।



**सौदी अरब : सोने की कार**

सौदी अरब में राजा सलमान का शासन है। वे दो पवित्र मस्जिदों के संरक्षक हैं। राजा के पास भव्य महल, निजी विमान और सोने की कार है। गद्दी पिता से पुत्र को मिलती है, और राजधानी रियाद व जेद्दा घूमने लायक हैं।

**स्वाजीलैंड : १५ पत्नियों वाला राजा**

स्वाजीलैंड के राजा मस्वाती III की १५ पत्नियां और ३० बच्चे हैं। यह गरीब देश है, जहां ९० गुना लोग गरीबी रेखा से नीचे हैं। उम्हलांगा समारोह में राजा नई रानी चुनते हैं।

**बहरीन : सख्त कानून**

बहरीन में राजा हमद बिन इसा अल खलीफा का शासन है। यह देश एक हजार नऊसो ३२ में पेट्रोलियम खोज के लिए प्रसिद्ध है। यहाँ राजा का अपमान करने पर सख्त सजा का प्रावधान है।

**यूएई : शेख का शासन**

यूएई में अबूधाबी के शेख खलीफा बिन जायद अल नाह्यन राष्ट्रप्रमुख हैं। यहाँ शासन तानाशाही नहीं, बल्कि आधुनिक और सुगम है।

(नोट : यह देश अपनी परंपराओं और शाही वैभव के लिए मशहूर हैं, जो पर्यटकों को आकर्षित करते हैं।)

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# श्री मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर

**मोफत ऑपरेशनसाठी २५ रुग्ण पात्र**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री मंगळग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १९ ऑक्टो रोजी सकाळी मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील ३९ रुग्णांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी २५ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. त्यांना शुक्रवार, दि. २४ रोजी सकाळी ८ वाजता मंगळग्रह मंदिर येथून पनवेल येथील आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल येथे पुढील उपचारासाठी रवाना करण्यात येईल. डॉ. राहुल चौधरी आणि डॉ. गौरव तायडे (नेत्ररोग तज्ज्ञ, शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल) यांनी तपासणी केली. शिबिराचे मुख्य संयोजक भूपेंद्र वाघ, प्रशांत कोळी व अरुण पारधी यांचे विशेष सहकार्य लाभले. मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिव सुरेश बाविस्कर यांनी आभार मानले. जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, रजनीकांत पाटील, भूषण पाटील, मयूर चौधरी, नीतेश बारी, प्रमोद पाटील, गणेश शिंपी यांनी सहकार्य केले.



(छायाचित्र : विशाल पाटील)



**वेचणी पांढऱ्या सोन्याची...!** अवकाळी पावसामुळे आधीच पिचलेले असताना संसारदिवा पेटवत भविष्यातील सुवार्तेच्या अपेक्षेने मुडी बोदर्डे (ता. अमळनेर) येथील बळीराजाचे कुटुंबीय दिवाळीचा सण गोड करण्यासाठीच हे पांढरे सोने (कापूस) वेचत असावा, असेच ना? (छायाचित्र : योगेश महाजन)

# दर घटल्याने महिलांची सोने खरेदीसाठी बाजारात गर्दी

## एस. के. ज्वेलर्सला नवीन दालनाला प्रथम पसंती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धनत्रयोदशी व लक्ष्मी पूजनाच्या पार्श्वभमीवर शनिवार, दि. १८ व रविवार, दि. १९ रोजी सोने खरेदीसाठी महिलांची बाजारात मोठी गर्दी झाली होती. सोन्यातील नवनवीन डिझाईनच्या दागिन्यांना महिलांची मोठी पसंती दिसून येत आहे. शहरातील नामवंत एस. के. ज्वेलर्सच्या दुसऱ्या नवीन दालनाला महिलाची प्रथम पसंती होती.



महिलांनी सोन्याच्या बांगड्या, हार, अंगठ्या आणि नवनवीन डिझाईनचे सेट खरेदी केले. आकर्षक सजावट, मनमोहक नवे नमुने आणि ग्राहकांसाठी विशेष दिवाळी सवलत यामुळे दुकानात दिवसभर ग्राहकांची रिघ लागलेली दिसली. पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देणारे डिझाईन आणि शुद्ध सोन्याची खात्री यामुळे एस. के. ज्वेलर्स हे ग्राहकांच्या पसंतीस पात्र ठरले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. खास दिवाळीनिमित्त आम्ही नवीन कलेक्शन उपलब्ध करून दिले. ग्राहकांना शुद्ध सोन्यासह आकर्षक ऑफर्स देत आहोत, असे एस. के. ज्वेलर्सच्या संचालकांनी सांगितले. दिवाळीत सोन्याची खरेदी ही शुभ मानली जाते. एस. के. ज्वेलर्समधील नवीन डिझाईन आणि सेवा उत्कृष्ट आहे. आम्ही दरवर्षी येथेच खरेदी करतो, असे ग्राहकांनी सांगितले. दरम्यान, शहरातील इतर सुवर्णदालने आणि ज्वेलरी शोरूममध्येही दिवसभर खरेदीचा जोर कायम राहिला. दिवाळीपूर्वीची ही खरेदीची लगबग पाहून संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

– जळगावच्या सुवर्ण बाजारात एकाच दिवसात चांदीच्या भावात मोठी वाढ झाली आहे. चांदी २ लाखांकडे झेप घेतली आहे. तब्बल ११ हजार रुपयांनीवाढ होऊन ती १ लाख ८० हजारांवर पोहचली आहे. मागील चार दिवसांत चांदीमध्ये तब्बल २७ हजाराहून अधिक वाढ झाली आहे. दिवसेंदिवस वाढत जाणरा तुटवडा व त्यात वाढती मागणी यामुळे भाव झपाट्याने वाढत आहे.

# काँग्रेसतर्फे उद्यापासून कामतवाडी–कपिलेश्वर पदयात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहर व तालुका काँग्रेसतर्फे मंगळवार, दि. २१ ते शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर दरम्यान सुसंवाद पदयात्रा निघणार आहे. कामतवाडी ते कपिलेश्वर असा मार्ग आहे. मंगळवारी सकाळी ७ ला कामतवाडी (रामेश्वर) येथून पदयात्रेला सुरुवात होईल. नांदेड, धावडे, सावखेडा, मुंगसे, रुधांटी मार्गे मठगव्हाण येथे मुक्काम राहील. बुधवारी, दि. २२ रोजी सकाळी मठगव्हाण येथून पातोंडा, नांद्री, खवशी, खेडी, अमळगाव, मेहेरगाव मार्गे पिंगळवाडी येथे मुक्काम राहील. त्यानंतर गुरुवार, दि. २३ रोजी सकाळी पिंगळवाडे येथून हिंगोणे बुद्रुक, मुडी, करणखेडा मार्गे मारवड येथे मुक्काम राहील.

शुक्रवार. दि. रोजी मारवड येथून गोवर्धन, कळमसरे, निम व दुपारी ३.३० ला कपिलेश्वर येथे पदयात्रेचा समावेश होईल. पदयात्रे दरम्यान, ‘ हम चलेंगे हाथों मे लेकर हाथ, अपनोंसे होगी सपनोंकी बात...! ’ पदयात्रेत परिसरातील विविध अडचणी, समस्या, कामांमधील अडथळे, समजून घेण्यासाठी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांची सुसंवाद साधणार आहे. तरूणांना भेटून त्यांच्या रोजगाराच्या समस्याही ते जाणूण घेणार आहेत.

महिलांच्या असुरक्षितते बाबत महिलांशी चर्चा होणार आहे. शेतकरी बांधवांच्या आसमानी, सुलतानी संकटांवर मात करण्यासाठीचे विविध उपाय यावर सखोल चर्चा होणार आहे.

संवाद यात्रेतून ग्रामस्थ शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

पदयात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सुर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, युवक काँग्रेसचे महेश पाटील, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस संदिप घोरपडे यांनी केले आहे.



(छायाचित्र : समीर सांगळे)

# गांधली पुरा पोलीस चौकीसमोरच पडला भलामोठा खड्डा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरातील गांधलीपुरा परिसरात नागरिकांना रस्त्याऐवजी खड्ड्यांमधूनच प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे, गांधलीपुरा पोलीस चौकीसमोरच भलामोठा खड्डा पडला आहे. ड्युटीवर जाणाऱ्या पोलिसांना त्यातून जावे लागत असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला आहे. ठिकठिकाणी खडी व मुरूमही बाहेर येत आहे.

रस्त्यावरील डांबर उखडून वर आले आहे. सततच्या वाहतुकीमुळे आणि अवजड वाहनांच्या दाबामुळे रस्ताही खोलवरही गेला आहे. काही ठिकाणी उंचवटे तयार झाले आहेत. दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डे न दिसल्याने लहान– मोठे अपघात होत आहेत. स्थानिकांनी वारंवार पालिका प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले. मात्र, याकडे पालिका प्रशासनाचे दूर्लक्ष आहे. पोलीस चौकीसमोर पडलेला खड्डाच बुजला जात नाही, तर इतर भागातील रस्त्यांचे काय होईल? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

# अमळनेरला ‘नीमा’तर्फे धन्वंतरी पूजन, फराळ वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नॅशनल इंटीग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) अमळनेर शाखेतर्फे धन्वंतरी पूजन सोहळा शनिवार, दि. १८ रोजी अथर्व आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक येथे उत्साहात झालो.

डॉ. सुशिलकुमार बडगुजर, डॉ. संजीव चव्हाण, डॉ. अंजली चव्हाण, डॉ. रवींद्र जैन, डॉ. अतुल चौधरी, डॉ. लिना चौधरी, डॉ. दिनेश पाटील, डॉ. रुपाली पाटील, डॉ. सचिन पाटील, डॉ. विशाल बडगुजर, डॉ. तुषार परदेशी, डॉ. नीता परदेशी, डॉ. मिलिंद वैद्य, डॉ. मयंक वैद्य, डॉ. पूजा वाघुळे, डॉ. अक्षय न्हाळदे, डॉ. माधुरी न्हाळदे, डॉ. हेमंत कदम, डॉ. हितेश मोरे, डॉ. अश्विनी महाजन, डॉ. भूपेंद्र पवार, डॉ. रईस बागवान, डॉ. चेतन पाटील, डॉ. रवींद्र चौधरी आणि डॉ. अरुणा चौधरी यांचा सहभाग होता. कार्यक्रमात आरोग्यसेवेत आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यक यांचा समन्वय, समाजात आरोग्य जनजागृतीचे महत्त्व यावर सखोल चर्चा करण्यात आली.


प्रथम पुण्यस्मरण



तुझं आयुष्य म्हणजे एक सुंदर फुल
ज्याने सगळ्यांना सुगंध दिला,

फुल निघून गेलं तरी तो सुगंध आजही दळवतो आहे...

जगण्याचा अर्थ,नात्यांची ओळख,
आणि प्रेमाची भाषा तू शिकवलीस.
आता तू नाहीस, पण तुझ्या शिकवणींनी
आम्हाला जगायला शिकवलंय..

जीवन थांबत नाही... पण तुझ्याविना अपूर्ण वाटतं..
जयश्री.., तू दिलेलं प्रेम, ऊब आणि साथ
आयुष्यभर विसरू शकत नाही..

तू प्रत्येक नात्याला दिला सन्मान,
प्रत्येक दुःखात दिला आधार,
आजही तुझं हसणं डोळ्यात भरतं आणि मन भिजवतं...
तुझी आठवण आमच्यासाठी दीपस्तंभासारखी राहील...

हीच तुझ्याप्रती आमची भावपूर्ण आदरांजली

स्व. सौ. जयश्री सुनील चौधरी
स्वर्गवास : रविवार 20 ऑक्टोबर 2024

शोकाकुल
श्री. सुनील राजाराम चौधरी
चि. कल्याणी सुनील चौधरी
चि. गौरव सुनील चौधरी
सौ. लिलाबाई राजाराम - जयश्री भटू राजाराम चौधरी
सौ. माया- धनराज राजाराम चौधरी
सौ. अश्विनी-मयूर भटू चौधरी
शुभम धनराज चौधरी - दिव्या धनराज चौधरी
भुषण भटू चौधरी - संमथा मयूर चौधरी
तुषार धनराज चौधरी

समस्त चौधरी परिवार, अमळनेर



फ्रेश पॉईंट
चहा | कॉपी | ग्रीन टी | दूध
थंड पेय | ब्लॅक टी | लेमन टी
तुमचं मूड करा फ्रेश...!
पत्ता : ट्रक टर्मिनस शॉपी, बाजार समिती समोरील दत्त मंदिर समोर, धुळे रोड, अमळनेर



तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# अभ्यंगस्नानात उटण्याला विशेष महत्त्व!



दिवाळीतील अभ्यंगस्नानात उटण्याला विशेष महत्त्व आहे. उटणे अंगाला लावण्याची पद्धत कशी असावी, याचे विश्लेषण येथे देत आहोत. उटणे हे रजोगुणी तेजोमय असल्याने ते अंगाला लावतांना घड्याळाच्या काट्याच्या दिशेने बोटांच्या अग्रभागाचा अंगाला स्पर्श करून थोडेसे दाबून लावावे. प्रत्येक ठिकाणी दिलेली उटणे लावण्याची पद्धत त्या त्या पोकळीत असणाऱ्यात्रासदायक वायूंच्या गतीला अनुसरून दिली आहे.

**स्वतःला उटणे लावणे**

**१) कपाळ =** कपाळावर लावताना मधल्या तीन बोटांचा उपयोग करून स्वतः लावताना डावीकडून उजवीकडे या पद्धतीने लावावे.

**२) कपाळाच्या दोन्ही टोकांना बाजूला भुवईजवळ =** येथे लावताना ते बोटांच्या अग्रभागांनी डावीकडून उजवीकडे (खालून वरच्या दिशेने), तसेच उजवीकडून डावीकडे (वरून खालच्या दिशेने) चोळून लावावे.

**३) डोळ्यांच्या पापण्या =** यावर लावताना नाकाकडून कानाकडे हात फिरवावा.

**४) नाक =** याला लावताना उजव्या हाताच्या अंगठा आणि तर्जनी यांनी नाकाच्या दोन्ही बाजूंनी खालच्या दिशेने उतरत यावे अन् खाली आल्यावर उटण्याचा वास घ्यावा. उटण्याच्या वासातून प्रक्षेपित होणाऱ्या तेजाशी संबंधित गंध फुफ्फुसांतील वायूकोषात गेल्याने तेथील काळे आवरण नष्ट होण्यास सहाय्य होते.

**५) मुखाचा वरचा भाग =** या भागातून म्हणजेच नाकाच्या खालून मधली तीन बोटे ठेवून आरंभ करून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने मुखाभोवती गोल, म्हणजेच हनुवटीच्या खड्ड्यातून वर स्वतःच्या डावीकडे जाऊन मुखाभोवतीचा गोल पूर्ण करावा.

**६) गालांच्या पोकळी =** गालाच्या मध्यभागातून आरंभ करून घड्याळाच्या काट्याप्रमाणे बोटांची अग्रे गोल-गोल फिरवून लावावे.

**७) कानाची पाळी =** ही तर्जनी आणि अंगठा यामध्ये धरून तिथल्या तिथे हलवून उटणे लावावे.

**८) दोन्ही कान =** दोन्ही कान हातांनी पकडून कानाच्या मागच्या बाजूला फक्त अंगठा ठेवून खालून वरच्या दिशेने फिरवावा.

**९) मान =** मानेच्या मागून मध्यातून दोन्ही हातांची बोटे पुढे विशुद्ध चक्राकडे आणणे.

**१०) छाती आणि पोट यांचा मध्यभाग =** उजव्या हाताच्या तळव्याने छातीच्या मध्यरेषेवर वरून खालच्या दिशेने नाभीकडे हात फिरवत आणणे.

**११) काखेपासून कमरेपर्यंत =** काखेपासून पितृतीर्थासारखा हात, म्हणजेच अंगठा एका बाजूला अन् चार बोटे दुसऱ्या बाजूला ठेवून अंगाच्या दोन्ही बाजूंच्या रेषेवरून वरून खाली या पद्धतीने फिरवावेत.

**१२) पाय आणि हात =** हाताची बोटे फिरवत पायांवर आणि हातांवर वरून खालच्या दिशेने उटणे लावावे.

**१३) पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषा =** पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषेवर अंगठा अन् तर्जनी यांनी विळखा घालून तो भाग कड्यासारखा घासावा.

**१४) डोक्याच्या मध्यभागी =** डोक्याच्या मध्यभागी तेल लावून ते हाताने घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरवावे.

दुसऱ्या व्यक्तीला उटणे लावणे

**१) पाठ =** दुसऱ्या व्यक्तीच्या पाठीला उटणे लावताना पाठीच्या मणक्याच्या रेषेशी दोन्ही हातांच्या बोटांची अग्रे येतील अशा पद्धतीने वरून खालच्या दिशेने दोन्ही हात एकाच वेळी फिरवावेत.

**२) कंबर =** दुसऱ्या व्यक्तीला लावताना कमरेच्या आडव्या रेषेवर पाठीकडून तिच्या डाव्या बाजूकडून उजवीकडे येऊन परत उजवीकडून डावीकडे जावे. असे परत-परत लावावे.

# यमदीपदान का करतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धनत्रयोदशी दिवशी सायंकाळी दिवे लागण्यावेळी यमदीप दान करतात. आपल्या कुटुंबात अपमृत्यूचे सावट येऊ नये, यासाठी दीपदान हा विधी करतात. घराबाहेर ११ किंवा २१ कणकेचे दिवे पेटवून त्यांची ज्योत दक्षिणेस करून पूजन करावे. सहसा दक्षिणेला ज्योत करून दिवा ठेवत नाही. फक्त याच दिवशी तसे दिवे ठेवून पूजा करतात. दक्षिण दिशेचा स्वामी यमदेव आहे. या देवतेस आपण अकाली मृत्यू हरणासाठी त्या दिवशी दीपदान करतो. त्यासाठी दक्षिणेकडे दिव्याची ज्योत करून दिवे ठेवावेत. नंतर दिव्यांना घरच्या सवाष्णीने हळद-कुंकू, पांढरी फुले व अक्षता वाहून नमस्कार करावा व दक्षिणेकडे तोंड करून खालील श्लोक एकवेळ म्हणावे.

**मृत्युनाम् पाश दंण्डाभ्यांम् कालेन श्यामयासह ।**
**त्रयोदश्याम् दीप दानात् सूर्यजः प्रीयताम् मम ।।**

यम देवाकडे आपल्यावर व आपल्या कुटुंबावर अपमृत्यू येऊ देऊ नको यासाठी प्रार्थना करावी. कुटुंबातील कोणीही व्यक्ती आपल्या कुटुंबाच्या भल्यासाठी हा उपाय करू शकते. तसेच कणकेचा मोठा एक दिवा लावला तरी चालेल.

**पौराणिक कथा**

एकदा यमराजाने आपल्या दूतास एक प्रश्न विचारला, की काय रे, आजपर्यंत तुम्ही अनेक लोकांचे प्राण हरण केले आहेत. हे करताना असा एखादा प्रसंग घडला का, की ज्यामुळे तुम्हाला वाईट वाटले. तुम्हालाही दुःख झाले? थोडा विचार करून दूतांनी उत्तर दिले, ‘ आठवतो... असा एक प्रसंग, आम्हाला आठवतो!’ धर्मराज म्हणाले, की ‘ सांग बरे !’ दूत म्हणाले, की ‘ महाराज, पृथ्वीवरील हेमराज नावाच्या राजाच्या मुलाचे प्राण हरण करताना आम्हाला अतिशय दुःख झाले. कारण महाराज, या राजकुमाराचा विवाह चार दिवसांपूर्वीच झाला होता. सगळ्या राज्यात, राजवाड्यात केवढा आनंदी आनंद होता. मात्र तो आनंद संपण्याच्या आत..., राजपुत्राने आपल्या विवाहाचा साजशृंगार उतरवायच्या आतच त्याचे प्राण हरण करण्याची वेळ आमच्यावर आली. नुकत्याच लग्न झालेल्या त्याच्या पत्नीपासून त्याचे प्राण हरण करताना आमचे डोळे ओले झाले. तिचा शोक पाहून आम्हालाही वाईट वाटले.’ हा प्रसंग ऐकून यमराजालाही वाईट वाटले. त्यांच्याही डोळ्यांत पाणी आले. तोच दूत पुढे म्हणाला, की ‘ महाराज कृपा करा. पुन्हा असा अपमृत्यूचा प्रसंग कुणावरही येऊ नये, असे काहीतरी करा! ’ विचार करून यमराज म्हणाले, की ठीक आहे, जे लोक या त्रयोदशीला मला दीपदान देतील आणि आजपासून पुढे पाच दिवस दीपोत्सव साजरा करतील त्यांच्यावर असा अपमृत्यूचा प्रसंग येणार नाही. तेव्हापासून ही यमदीपदानाची प्रथा पडली आहे, असे मानले जाते.

# शिवाजी महाराजांच्या काळात फटाके होते का?

**ग्लोबल महातेज वृत्तसवा**

शिवाजी महाराजांच्या काळात फटाके होते का? या विषयावर भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संशोधन करण्यात आले.

**संवाद :** या संशोधनाबाबत डॉ. सुचेता परांजपे यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली.

**ऐतिहासिक उल्लेख :** अकराव्या शतकात ‘ दिवाळी वीतल्या ’ असा पहिला उल्लेख मराठी साहित्यात आढळतो. त्या काळात लिहिलेल्या ‘ लीळाचरित्र ’ या ग्रंथातही भाऊबीजेचे वर्णन सापडते.

**पुराणातील संदर्भ :** ‘ चतुर्वर्ग चिंतामणी ’ आणि ‘ नीलमतपुराण ’ या ग्रंथांमध्ये दिवाळीच्या दिव्यांचे वर्णन आढळते. तसेच पाडव्याच्या दिवशी बलीची कथा वामनावतार संदर्भात बलिप्रतिपदेच्या रूपात नमूद केली आहे.

**दीपोत्सव आणि दिवाळी :** अकराव्या शतकानंतर दिवाळीचा स्पष्ट उल्लेख मिळतो. पण त्याआधी ‘ दीपोत्सव ’ असा सण साजरा होत असल्याचे संकेत आढळतात.

**संत साहित्य :** संत रामदास स्वामी आणि संत एकनाथ महाराज यांच्या काही श्लोकांमध्ये फटाक्यांचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे. उदा.- ‘ भरुनी रजतम औषध, करुनि अग्नियंत्र संनद्ध ’ या ओळींमधून फटाक्यांसारख्या साधनांचा उल्लेख दिसून येतो.

**तंत्रज्ञान विकास :** त्याकाळात गनपावडरचा शोध लागलेला असल्याने फटाके उडवणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होते.

**इतिहासाचा दृष्टिकोन :** शिवाजी महाराजांच्या काळात फटाके अस्तित्वात होते, परंतु त्यांचा थेट उल्लेख ऐतिहासिक नोंदींमध्ये नाही. तरीदेखील ते नव्हते असेही निषेधात्मकपणे सांगता येत नाही, असे डॉ. सुचेता परांजपे स्पष्ट करतात. शिवरायांच्या रणनितीचा साक्षीदार ऐतिहासिक अवचितगड किल्ला.



# श्री गणेश अन् देवी सरस्वतींची पूजा दिवाळीला महालक्ष्मींसोबत का होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात प्रत्येक वर्षी आश्विन मास अमावास्या तिथीला दिव्यांचा सण दिवाळी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी घराघरांत देवी महालक्ष्मीचे पूजन केले जाते. त्याचबरोबर श्री गणेश आणि देवी सरस्वतीचेही पूजन केले जाते. माता लक्ष्मीसोबत श्री गणेश आणि देवी सरस्वती यांच्या चित्रांमध्ये काही खास संदेश दडलेला आहे. ज्योतिषाचार्यांच्या म्हणण्यानुसार दिवाळीला माता लक्ष्मीसोबतच देवी सरस्वती आणि श्री गणेशची पूजा का केली जाते? हे आपण जाणून घेऊया.

माता महालक्ष्मी ही धनाची देवी आहे. देवी सरस्वती ज्ञानसमृद्धीची देवता आहे. श्री गणेशही बुद्धीचे अधिष्ठाता आहेत. याचा अर्थ असा, की आपण फक्त धनाचेच अवाहन करू नये. धनासोबतच ज्ञान आणि बुद्धीलाही बोलवावे. धन आले तर ते आपल्या ज्ञानाने सांभाळा आणि बुद्धीचा उपयोग करून त्याचा उपयोग करा. असे केल्याने माता लक्ष्मी यांचा स्थायी निवास होईल. म्हणूनच आपण सर्वजण दिवाळीला माता लक्ष्मी यांना प्रार्थना करतो, की माता लक्ष्मी यांनी आपल्या घरी यावे आणि सोबत विद्या आणि बुद्धीलाही आणावे.




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**दीपोत्सवं महत्पुण्यं बलीराज प्रवर्तते !**
**हरोहरती पापानी मंगलानि गृहेगृहे !!**

**अर्थ :** बळीराजा.दीपोत्सव करणे हे मोठे पुण्याचे काम आहे. हर म्हणजे शंकर (त्यामुळे प्रसन्न होऊन) सर्व पापे नाहीशी करतात. घरोघरी मंगलमयता येते.

पूजेच्या शेवटी बहुधा ‘ लोकक्षेम मंत्र ’ म्हटला जाई.

**स्वस्तिः प्रजाभ्यः परिपालयंतां**
**न्यायेन मार्गेण महीं महीशाः ।**
**गो ब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं**
**लोकाः समस्ताः सुखिनोभवंतु ॥**
**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥**

**अर्थ :** प्रजेचे आणि पृथ्वीचे परिपूर्णतः न्याय्य मार्गाने पालन करणाऱ्या राजांचे कल्याण..मंगल असो. गाई, ब्राह्मणांचे शुभ व्हावे. सर्व लोक..जन सुखी होवोत..सर्वत्र शांति सुख पसरूदे.

# वैदिक वास्तूशास्त्रानुसार घरात श्री गणेशांचा फोटो किंवा मूर्ती कशी असावी?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तूमध्ये श्री गणेशांची मूर्ती एक, दोन, तीन, चार, पाच मुखीही बघण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्रय दन्त मूर्तीही काही ठिकाणी आहे. सामान्यपणे श्री गणेश यांची मूर्ती २ नेत्र असलेली सर्वत्र प्रचलित आहे. परंतु तंत्र मार्ग संबंधित मूर्तीमध्ये त्री नेत्र असलेल्या मूर्तीची पूजा केली जाते. श्री गणेश यांची २, ४, ८ आणि १६ हातची मूर्ती आहे. १४ प्रकारच्या महाविद्यांवर आधारित १२ प्रकारच्या श्री गणेश यांच्या प्रतिमा घरात पूजन करू शकतात.

संतान श्री गणेश यांची १००८ नावे घेऊन या श्री गणेश यांची मूर्ती ज्या घरात संतान नाही अशा घरातील व्यक्तीने घरात या श्री गणेश यांच्या प्रतिमेची रोज पूजा करावी, अशी मान्यता आहे.

**विघ्नहर्ता गणेश :** श्री गणेश यांची मूर्ती घरात स्थापन केल्याने घरातील कलह, विघ्ने, अशांती, क्लेष, तणाव, मानसिक संताप, पती-पत्नीमधील वाद या सर्वांमध्ये खूप फरक पडतो.

**विद्या प्रदायक श्री गणेश :** मुलांची अभ्यासात रुची वाढण्यासाठी विद्याप्रदायक श्री गणेश मूर्तीचे पूजन मुलांकडून करून घेणे.

**विवाह नायक श्री गणेश :** श्री गणेश यांच्या या स्वरूपाच्या मूर्तीचे पूजन, आवाहन नित्य केल्याने घरातील मुला-मुलींचे लग्न होत नसेल, तर त्यांचे लग्न त्वरित जमते.

**चिंतानाशक श्री गणेश :** ज्या घरात चिंता, तणाव कायम असते अशा घरात या श्री गणेश यांच्या मूर्तीची स्थापना करावी. त्यानंतर पूजा-अर्चा केल्याने ताणतणाव कमी होतात.

**धनदायक श्री गणेश :** प्रत्येक व्यक्तीची अशी इच्छा असते, की आपण श्रीमंत व्हावे. आपल्या व्यवसाय क्षेत्रात वृद्धी व्हावी, यासाठी श्री गणेश यांच्या मूर्तीची स्थापना करून पूजन करणे आवश्यक आहे.

**सिद्धी दायक श्री गणेश :** प्रत्येक कार्यात यश यावे, मनोइच्छित कार्य पूर्ण व्हावे, या हेतूसाठी या स्वरूपातील श्री गणेश यांचे पूजन करावे.

सुपारी श्री गणेश : आध्यात्मिक क्षेत्रातील ज्ञान वाढविण्यासाठी या सुपारी श्री गणेश यांची पूजा करावी.

**शत्रूहंता श्री गणेश :** आपल्याला असलेल्या सर्व प्रकारच्या शत्रूंपासून होणारा त्रास कमी होण्यासाठी व्यवसाय कार्यातील शत्रूंचे बल कमी होण्यासाठी श्री गणेश यांची मूर्ती स्थापन करून पूजा करावी.

**आनंददायक श्री गणेश :** आपल्या परिवारात आनंदी वातावरण असावे, यासाठी श्री गणेश यांच्या मूर्तीची नित्य पूजा करावी.

**विजयसिद्ध श्री गणेश :** कोर्ट-कचेरी, न्यायालायतील कार्यात यश यावे म्हणून श्री गणेश यांचे पूजन करावे.

**ऋणमोचक श्री गणेश :** आपल्यावर असलेले कर्ज लवकरात लवकर कमी व्हावे, यासाठी श्री गणेश यांची पूजा करावी.

# आध्यात्मिकदृष्ट्या दिवाळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीची तयारी करताना आध्यात्मिकदृष्ट्या हा सण नकारात्मकता दूर करून सकारात्मकतेचा प्रकाश आणण्याची संधी आहे. या काळात आत्मचिंतन, आत्मशुद्धी आणि ज्ञानाचा प्रकाश अज्ञानाचा अंधार दूर करतो. दिवाळी केवळ बाह्य प्रकाशाची नव्हे, तर आंतरिक प्रकाशाचीही आठवण करून देते. नव्या वर्षासाठी संकल्प करण्याची प्रेरणा देते. त्यासाठी धनत्रयोदशीपासून पुढील पाच दिवस सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याकरिता स्वतःची आत्मशुद्धी करणे आवश्यक असल्याचे सांगितले जाते.

## दिवाळीचे आध्यात्मिक महत्त्व

**आत्मशुद्धी :** दिवाळी हा आत्मा शुद्ध करण्याचा आणि नकारात्मकता दूर करण्याचा महत्त्वपूर्ण काळ समजला जातो.

ज्ञानाचा प्रकाश : हा सण बाह्य प्रकाशासोबतच आंतरिक प्रकाशाची जाणीव करून देतो.

**सकारात्मकतेचा अनुभव :** हा सण सकारात्मकतेचा अनुभव देतो. तसेच नवीन सुरूवात करण्यासाठी प्रेरित करतो.

**आध्यात्मिक संकल्प :** दिवाळीच्या निमित्ताने अनेक लोक नवीन वर्षासाठी नव-नवे संकल्प करतात.

## आध्यात्मिक पैलू

**सण साजरा करण्याची पद्धत :** केवळ बाह्य तयारी न करता दिवाळीत आंतरिक शुद्धी आणि आत्मचिंतनावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

**सण साजरा करण्याची वेळ :** धनत्रयोदशीपासून सुरू होणारा दिवाळीचा पाच दिवसांचा हा काळ आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्वाचा असतो.

**दीपस्तंभ :** दिवाळीत घरात दिव्यांची रोषणाई तर करतातच. मात्र मनातही ज्ञानाचा दीप प्रज्वलित करण्याची आवश्यकता आहे.

